उत्कृष्ट क्वालिटी
साबुदाणा
५५ रु.किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.११० ■ शनिवार २५ जानेवारी २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

Post Regd.No./DHL/53/24-26


डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध
गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णावर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार
दि.२७ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत.
संपर्क :- डॉ.गौतम शाह M.S. (ऑर्थो) शाह क्लिनिक
श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३)
भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८

## वक्फ बोर्ड विधेयक संयुक्त समितीच्या बैठकीत प्रचंड गोंधळ
## शिवसेनेचे अरविंद सावंत, ओवैसींसह दहा खासदार निलंबित

**नवी दिल्ली, दि.२४- वादग्रस्त वक्फ विधेयकावरील संयुक्त संसदीय समितीचा (जेपीसी) ५०० पानी अहवाल तयार झाला आहे. या अहवालावर शुक्रवार आणि शनिवार अशी दोन दिवस बैठक होऊन चर्चा होणार होती. मात्र आज बैठकीच्या पहिल्या दिवशीच खासदारांमध्ये गदारोळ झाला. ज्यामुळे आता विरोधी पक्षाच्या दहा खासदारांना समितीमधून निलंबित करण्यात आले आहे. निलंबित करण्यात आलेल्या खासदारांमध्ये शिवसेना (ठाकरे) पक्षाचे अरविंद सावंत, असुदद्दीन ओवेसी यांचा समावेश आहे.**

या बैठकीत अहवालावर चर्चा होऊन ते विधि मंत्रालयाकडे दिले जाणार होते. यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सदर विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे. भाजपाचे खासदार जगदंबिका पाल हे या संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष आहेत. ते म्हणाले की, आज आम्ही जम्मू-काश्मीरमधील शिष्टमंडळ मीरवाईज उमर फारूक यांच्या शिष्टमंडळाला त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी वेळ दिला होता. मात्र संसदेत विधेयकाच्या चर्चेत सहभागी न होणारे असदुद्दीन ओवेसी आज मात्र चर्चेत सहभागी झाले. तसेच तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी माझ्याशी असभ्य वर्तन करत असंसदीय भाषा वापरली. मी त्यांना शांत करण्याचे आवाहन करत होतो. पण ते ऐकायला तयार नव्हते. अखेर भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी खासदारांचे निलंबन करण्याचा प्रस्ताव दिला.

निलंबित करण्यात आलेल्या खासदारांमध्ये कल्याण बॅनर्जी, मोहम्मद जावेद, ए. राजा, असदुद्दीन ओवेसी, नसीर हुसेन, मोहिबुल्ला, मोहम्मद अब्दुल्ला, अरविंद सावंत, नदीम-उल हक आणि इम्रान मसूद यांचा समावेश आहे. आजच्या बैठकीची सुरुवात गोंधळाने झाली. विरोधी पक्षातील खासदारांनी आरोप केला की, त्यांना विधेयकात जे बदल सुचविले आहेत, त्या नव्या मसुद्याचा अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ दिलेला नाही. काँग्रेसचे खासदार इम्रान मसूद यांचे संसदीय समितीमधून निलंबन झाल्यानंतर त्यांनी म्हटले **(पान ४ वर)**



## एसटीच्या तिकीट दरात मोठी वाढ


मुंबई, दि.२४- एसटी महामंडळाने गेल्या तीन वर्षात एसटीच्या तिकीट दरात कोणतीही वाढ केली नव्हती. मात्र, आता एसटीचा प्रवास महागला आहे. एसटीच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एसटी महामंडळाने भाडेवाढीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवला आल्याचे काही दिवसांपूर्वी सांगितले जात होते. यानंतर अखेर आता एसटीच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय **(पान ४ वर)**

## तळोद्यात घरफोडी; सव्वादोन लाखांचा ऐवज लंपास

**नंदुरबार, दि. २४ (प्रतिनिधी) - घर बंद असल्याची संधी साधत चोरट्यांनी भरदिवसा धाडसी घरफोडी केल्याची घटना तऱ्हावद येथे घडली. धान्याच्या पत्री कोठीतून चोरट्यांनी रोकडसह चांदीचे दागिने असा एकुण २ लाख २० हजाराचा ऐवज लांबविला आहे. याप्रकरणी अनोळखींविरुद्ध तळोदा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

तळोदा तालुक्यातील तऱ्हावद येथील रुमा जेरमा वळवी यांच्याघरी चोरी झाली आहे. घर बंद असल्याची संधी साधून चोरट्यांनी दरवाजाचे कुलूप तोडून सकाळी ८ ते १२ वाजेदरम्यान भरदिवसा घरात प्रवेश केला. घरातील धान्याच्या पत्री कोठीचे कुलूप तोडून स्टीलच्या डब्यातील चांदीचे दागिने व रोकड लांबविली आहे. त्यात १ लाख ५० हजाराची रोकड, **(पान ४ वर)**

सेवा
सुपर स्पेशालिटी न्युरोट्रॉमा व क्रिटीकल केअर सेंटर
PATIENT SAFETY & QUALITY OF CARE NABH (ENTRY LEVEL) PRE ACCREDITED
सुप्रसिद्ध तज्ञ न्यूरोसर्जन यांच्याकडून
मोफत तपासणी व मार्गदर्शन शिबीर
आपणास कळविण्यांत आनंद होतो की, सेवा सुपर स्पेशालिटी व क्रिटीकल केअर सेंटर धुळे यांच्यातर्फे मेंदु विकार आणि पाठीचे मणक्या आजार संबंधित तपासणी व मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यांत आले आहे.
खालील लक्षणे आढळून आल्यास आवर्जून शिबिरात यावे.
डोकेदुखी | मानदुखी | पाठदुखी | ब्रेनट्युमर | अर्धांगवायू (पॅरेलिसीस)
कंबर दुखी (मनक्यांसबंधित आजार)



डॉ. श्रीकांत बामणे
Chief Neurosurgeon
MS, MCH
आवश्यक चाचणी अल्पदरात
वार - रविवार दि. - २६/०१/२०२५ वेळ - ११ ते ३ पर्यंत.
ठिकाण - सेवा सुपर स्पेशालिटी व क्रिटीकल केअर सेंटर
मिशन कंपाऊंड, साक्री रोड, धुळे 02562 - 246333, 247555

## १६ वे पुण्यस्मरण

दिव्यत्वाची जेये प्रचिती तेथे कर आमचे जुळती



**कर्मयोगी नंदकिशोरजी उदयरामजी**

(स्व.२५/०१/२००९)

श्रमाच्या घामात नित्य शोधावा राम नंदकिशोरजींना देती
वसा, पिता उदयराम, तोच वारसा चालवून
बांधवी प्रेमाची सांगड, आपल्या कर्म योगाने प्रसिध्द परिवार
बांगड आपल्या कुशलतेची नित्य आम्हा आठवण तिच
आपुली पुण्यांची आहे आमची साठवण

* शोकाकुल *

मुले - अनिल, नितीन
सुना- सौ.सरीता, सौ.संध्या, श्रीमती अनिता अतुल,
जावई - ललीत कुमारजी मंत्री
नातवंडे - सौ. प्रियंका जिगनेशजी शाह,
प्रणीत व सौ.राधिका बांगड
प्रतीक, अर्पीता, अनुजा, कृष्णा, प्रचिती,
ध्रुवी शाह, कवीश मंत्री, पुर्वी समस्त बांगड परिवार

फर्म्स:-भेरुलाल नंदकिशोर ॲण्ड कंपनी, धुळे
बांगड कुलर ॲण्ड फर्निचर, धुळे

## भावपूर्ण श्रध्दांजली



**स्व.श्रीमती रतनबाई इंदरचंदजी खिंवसरा**

स्वर्गवास दि. २५/१/२०२१

सौम्यता उनकी सुगंध थी
आनंद उनका जीवन था
सत्कर्म उनकी शोभा और
परोपकार उनका कर्तव्य था
भगवान आपकी दिव्य आत्मा को शांति प्रदान करें।

श्रध्दावनत

सीए. के. यु. नाबरिया - सौ. प्रभा नाबरिया
सीए. मधुर नाबरिया - सौ. मोनाली नाबरिया
ॲड. विपुल नाबरिया - सौ. रुपाली नाबरिया
मंथन, जीत, जिनेश, कु. निशिता, मिष्टी, युग्वी
एवं नाबरिया परिवार, धुलिया

Mahavir

## महसुल अधिकारी मारहाण
## आरोपीला तत्काळ अटक करा; मागणी

धुळे, दि.२४- धुळे ग्रामीण तहसिल कार्यालयात सहा.महसुल अधिकारी सुरेश रखमाजी पाईकराव यांना दि.२० जानेवारी रोजी जातीवाचक शिवीगाळ व मारहाण करण्यात आली. या प्रकरणातील मुख्य आरोपीला ताबडतोब अटक करण्यात यावी. अशी मागणी करणारे निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांना नागरिकांनी दिले आहे. महसुल कार्यालयात सहा.महसुल अधिकारी पाईकराव यांना मारहाण व शिवीगाळ करणारा मुख्य आरोपी पोलीसांना अद्याप सापडत नाही. तक्रार नोंदवून चार दिवस झाले तरी पोलीसांचा तपास गतीने होत नाही. अशा गुन्ह्यातील गुन्हेगारांना शिक्षा झाली नाही तर प्रशासनाबद्दल आदर व कायद्याची भिती राहणार नाही. मुख्य आरोपीला ताबडतोब अटक करण्यात यावी. अशी मागणी माजी प्राचार्य एम.बी.हातेकर, अनिल दामोदर, आनंद लोंढे, ॲड.विशाल साळवे, ॲड.राहुल वाघ, किरण गायकवाड, हरिश्चंद्र लोंढे, आबा कापडे, राजु जाधव यांनी केली आहे.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -74,000 रु.+3% GST
सोने- 24 K -80,800 रु.+3% GST
चांदी- 95,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३



लोकमित्र तात्यासाहेब दिलीप उमराव जगताप
जानकी नगर व चंद्रदिप नगर परिसर प्रवेशद्वार माजी नगराध्यक्ष न.पा. धुळे
कष्ट आणि प्रामाणिकपणे जीवन जगत,
शुन्यातून विश्व निर्माण करणारे, कष्टकरी आणि गरीबांचे मसिहा
माजी नगराध्यक्ष, लोकमित्र, माणुसकीचा महासागर
लोकमित्र स्व.तात्यासाहेब दिलीप उमराव जगताप
प्रवेशद्वार
उद्घाटन साहळा
शनिवार दि.25/01/2025 रोजी
सायं 4 वाजता.
पत्ता - ध्रुव होंडा शोरुमच्या बाजुला, वाडिभोकर रोड, धुळे



उदघाटन हस्ते ना.श्री.जयकुमार रावल
(राजशिष्टाचार व पणन मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री धुळे जिल्हा)
संकल्पना
श्रीमती.वैशाली भिकन आप्पा वराडे (माजी महापौर,धुळे मनपा)
श्री.नरेशआप्पा चौधरी (माजी नगरसेवक,धुळे महानगरपालिका)
श्री.अनुपभैय्या ओमप्रकाश अग्रवाल (आमदार, धुळे शहर)
श्रीमती.प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी (माजी महापौर,धुळे मनपा)
निमंत्रक
आक्कासाहेब.चंद्रकला दिलीप जगताप
श्री.राहुलशेठ दिलीप जगताप श्री.केतन दिलीप जगताप
श्री.दिनेश दिलीप जगताप डॉ.श्री.राकेश दिलीप जगताप
चि.आदित्य केतन जगताप
लोकमित्र स्व.तात्यासाहेब दिलीप उमराव जगताप प्रतिष्ठान,धुळे



आपला महाराष्ट्र

# नित्यनूतन संविधान व प्रजासत्ताक चिरायू व्हावे

भारतीय प्रजासत्ताक पंचाहत्तर वर्षे पूर्ण करून ७६ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. प्रजासत्ताक व्यवस्थैमुळे आपण आणि आपला देश संविधानाशी बांधील आहे.त्यातील तरतुदी आणि तत्वे मूलभूत असून कोणी कितीही त्यांना नाकारण्याचा प्रयत्न केला तरी नाकारू शकत नाही. एवढे ते पक्क आणि अभेद्य आहे. सर्व सामान्य, सर्व धर्मीयांच्या मनात ते आहे.सप्त स्वातंत्र्ये संविधानाने आपल्याला प्रदान केलेली आहेत. त्याचा वापर आपण मनसोक्त करीत आलो आहोत. स्वैर वापरामुळे बेफाम झालेल्यांना अवघे अवकाश व्यापत एका संप्रदायाच्या माध्यमातून देशावर अधीराज्य गाजविण्याची ईच्छा असली तरी संविधानातील तरतुदींमुळे ते शक्य होत नाही हे वेळोवेळी सिध्द झालेले आहे. हा संविधानाचाच विजय म्हटला पाहिजे. असे असले तरी पंचाहत्तर वर्षे देशाची लोकशाही टिकून ठेवणाऱ्या संविधाना बाबत अलिकडे अनेक वेगवेगळे सूर काढले जात आहेत. राग आळवले जात आहेत. एक मोठा वर्ग देशात असा आहे की, तो भारतासारख्या बहुमुखी, बहुआयामी, बहुसांस्कृतिक देशाला केवळ संविधानानेच एकसंघ जोडून ठेवलेले आहे असे मानतो. दुसरा वर्ग असा आहे की त्यास भारताचे संविधान भारतीय वाटत नाही. अशा स्थितीत जो सामान्य नागरिक आहे तोच संविधानाशी घट्ट बांधिलकी मानणारा आहे.त्याने भलतीकडे वाहत जाऊन चालणार नाही यातच भलाई आहे. नुकत्याच झालेल्या संसदेतील चर्चेत प्रस्तावना करताना केंद्रिय मंत्र्यांनी ज्यांचा संविधानाशी संबंध नाही किंबहुना विरोध होता त्यांची नावे घेतली.विरोधी पक्षांनी त्यावर आक्षेप घेतला.गदारोळ केला. विरोधी पक्षातील अभ्यासकांनी सांगितले की, आमच्या देशाच्या संविधानात समाजातील दुर्लक्षित, मागास, नाहीरे वाल्या घटकांसाठी अनेक तरतुदी असून त्या माध्यमातून त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो.असे असूनही हा वर्ग खूप संकटे झेलत जगतो आहे.अल्पसंख्यकांना तर अघोषित दुय्यम दर्जाचे नागरिक म्हणूनच एक वर्ग वागवितो. सत्तेत असलेल्या पक्षाच्या नेत्यांनी तर सभागृहात आणि सभागृहात बाहेर उलटे आरोप केले की, संविधानावर किंवा त्यातील मूल्यांवर हल्ले नेहरूंनी केले. वास्तविक नेहरूंनी संवैधानिक तरतुदीच्या अधीन राहून देश कसा धर्म निरपेक्ष आणि समाजवादी तत्वानुसार चालेल असेच प्रयत्न केले हा इतिहास आहे. श्रीमती इंदिरा गांधी यांनी जारी केलेली आणीबाणी, राजीव गांधी यांनी शहाबानो प्रकरणात केलेला हस्तक्षेप तसेच राहुल गांधी यांनी संसदेत फाडलेले विधेयक अशा काही घटनांचे उल्लेख करीत नेहरु परिवारच कसा संविधानाचा शत्रू आहे ते बिंबविण्याचा प्रयत्न करण्यात आला. पैकी आणीबाणी संविधानातील तरतुदींचा आधार घेऊनच जारी केली होती. ती ताबडतोब हटविली देखील. शहाबानो आणि विधेयक फाडण्याचे मुद्दे गैर लागू असून त्या त्या वेळेची ती गरज होती. तसे सिध्द झालेले आहे.

भारताचे संविधान पाश्चिमात्य ढंगाचे आहे आणि ते आमच्यावर लादलेले आहे असे धर्माधिष्ठित व्यवस्थेवर विश्वास असणाऱ्यांचे सुरूवाती पासून म्हणणे आहे. त्यांच्या पूर्व सूरींनी तर संविधानाला कडाडून विरोध केलेला आहे. अल्पसंख्यकांचे लांगुलचालन आणि एक गठ्ठा मतांच्या साठी संविधानाचा उपयोग केला जातो आहे असेही त्यांचे म्हणणे आहे. दुसरीकडे स्वातंत्र्य आता मिळाले आहे.१९४७ साली मिळालेले स्वातंत्र्य हे तांत्रिक असल्याचे छदमीपणाने हे लोक बोलतात.असे असतानाच संविधान लागू झाल्याची पंचाहत्तर वर्षे हेच लोक साजरे करतात. हा दुतोंडी व्यवहार तेच करू जाणोत. वास्तवात स्वातंत्र्याच्या लढ्याच्या काळात जी मूल्ये प्रस्थापित झाली त्या मूल्यांचे प्रतिनिधित्व संविधान करीत आहे. ते तयार करताना घटनाकारांनी देशातील दीर्घ सांस्कृतिक परंपरांचा अभ्यास करून त्यात तशा तरतुदी करून ठेवल्या आहेत. मात्र स्वातंत्र्याच्या आंदोलनात ज्यांनी देशाची बहुसांस्कृतिकता मान्य करून उडी घेतली त्याच वेळी आंदोलनात दूर दूर पर्यंत संबंध नसलेल्यांनी कधीच बहुसांस्कृतिकता मान्य केली नाही. तेच लोक संविधानाच्या विरोधात गळे काढत आहेत. एक देश एकच धर्म ही संकल्पना मानणारे बाकीच्या धर्मांची तत्वे आणि ते देशाचे अविभाज्य अंग असूनही नाकारतात म्हणजे ते संविधान विरोधीच कृती करतात. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांनी असे स्पष्टपणे नमुद केलेले आहे की, देशातील कोणत्याही सरकारला संविधानाची छेड काढता येणार नाही असे ठरवावे लागेल.पूर्णपणे संविधान लागू होईल आणि त्यावर अंमल होईल अशी व्यवस्था निर्माण व्हावी असे बाबासाहेब तसेच नेहरूंना वाटत होते. मध्यंतरी अटल बिहारी वाजपेयी यांचे सरकार देशात आले तेव्हा संविधानाची समीक्षा करण्याचे ठरविले होते.तेव्हा पासूनच त्या विचारांच्या पक्षात या विषयासंबंधी घ्या हालचाली सुरू झाल्या होत्या. चौदा पक्षांचे सरकार असल्याने समीक्षा शक्य होऊ शकली नाही. आताही बहुमत नाही त्यामुळे त्यांची अडचण आहे.

तुर्तास तरी संविधानात कुठलाही बदल करण्यात आलेला नाही. परंतु विशिष्ट लोकांनी बदल करण्याची ईच्छा मात्र व्यक्त केली आहे. त्यासाठीच शासक पक्षाला चारशे पार खासदार पाहिजे होते. काहींनी तर तसे घोषित ही केले होते. देशात अशा प्रकारे बोलणारांची संख्या आता खूप आहे. त्यांना सत्तेमुळे बळ मिळाले असून न्यायव्यवस्थेत असलेले देखील उघड उघड बोलू लागले आहेत.जे बहुसंख्याकांच्या हिताचे आहे तेच स्वीकार केले जाईल आणि ते समान नागरी कायद्यातून साध्य होईल असेही एका न्यायाधीशांनी म्हटले. यावरून वारे कुठल्या दिशेने वाहत आहेत ते लक्षात येईल. राहुल गांधी यांनी संसदेतील चर्चेत भाग घेताना स्पष्टपणे संविधानात विरोध असणाऱ्यांचा नामोल्लेख करीत जाहीर हजामत केली.मुद्दा असा आहे की,शासक पक्षाने नाईलाजाने चर्चा लावली.वेगळा सूर देखील लावला पण विरोधकांनी तो उधळून लावला.सर्वात महत्वाचा मुद्दा हा की,संविधानाची प्रास्ताविकाच इतकी स्पष्ट आणि जागतिक मूल्यांची बरोबरी करणारी आहे की,त्यास पर्याय नाही.ज्ञानदेवांनी वसुधैव कुटुंबकम ची संकल्पना मांडली,विश्वासाठी पसायदान मागितले तेव्हा संविधानाचा काही संबंध नव्हता तरीही साडे सातशे वर्षांपूर्वी संविधानातील तरतुदींचा जागर त्यांनी केलेला आहे.खरे तर तथाकथित संस्कृती रक्षकांनी ज्ञानदेवांना दैवत मानताना त्यांचा व्यापक विचार लक्षात घेतला पाहिजे. घटनाकारांनी तो घेतला म्हणूनच व्यापक मूल्यांची पाठराखण संविधानात होऊ शकली. विनोबांनी जय्जगतचा नारा याच संकल्पनेच्या अधीन राहून दिलेला आहे.या सर्व बाबींचा विचार करून भारतीय विवेकवादी जनतेने लोकसभेच्या निवडणुकीतून योग्य तो निर्णय घेतला आणि राक्षसी बहुमतापासून शासक पक्षाला रोखले. हा संविधानाचाच विजय म्हटला पाहिजे.ही भावना परिपक्व होत जावो कारण ते नित्यनूतन आहे. ते वर्धिष्णू होवो आणि प्रजासत्ताक चिरायू होत जावो अशा सदिच्छा आम्ही व्यक्त करीत आहोत.



# विधवा निराधार महिलांसाठी युवा प्रतिष्ठानचा उपक्रम

**शहादा, दि.२४ (प्रतिनिधी)- सारंगखेडा येथील युवा प्रतिष्ठानने महिलांसाठी हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले होते.**

या कार्यक्रमाच्या मंचावर प्रामुख्याने विधवा महिलांना मान देण्यात आला, एकमेकांच हळदी कुंकू करत महिलांनी आवडीने तीळ गूळ वाटप केले. मकर संक्रांती नंतर हळदी कुंकू कार्यक्रम सर्वत्र होतात मात्र सामाजिक उपक्रम नावीन्यपूर्ण करण्याचा युवा प्रतिष्ठान टीमचा मानस कायमच असतो. यावेळी सुमनबाई साटोटे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून उपस्थित स्त्रियांना अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या दर्शना पवार लिखित क्रांतिज्योती सावित्रीआई व प्रेरणास्थान राजमाता जिजाऊ यांचे पुस्तकाचे वाटप करण्यात आले. अध्यक्षस्थानी अनुसयाबाई निकवाडे होत्या. साडीचोळी भेटपेक्षा विचारांचा वारसा जपुया, पुस्तकं भेट देऊ या तसेच महिलांविषयी अंधश्रद्धा बाळगणाऱ्या मानवी समाजाला सुरंग लावून, मासिक पाळी आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन संस्थापक अध्यक्ष दिपक साटोटे यांनी केले. स्त्री समानता महिला सक्षमीकरण विषयी कार्याध्यक्ष कपिल भोई माहिती दिली. महिला वैचारिक स्वातंत्र्य व सामाजिक संस्कारिक सलोखा जोपासण्याचे उद्दीष्टे ठेवून महीला प्रतिनिधी म्हणून मनोगत अनिता ढोले व कार्यक्रमांचे आयोजकांचे आभार आशाबाई मोरे यांनी मानले. गावातील बचत गटाच्या सदस्या, महीला, युवती हजर होत्या. युवा प्रतिष्ठानचे सचिव योगेश पाटील, खजिनदार पंकज भोई, बापू मोरे सर, जयेंद्र भोई, राहुल साटोटे, महेश भोई, ललित मोरे व उपस्थित युवकांनी कार्यक्रमासाठी अनमोल सहकार्य केले.

# नोबेल फाऊंडेशनच्या वेलीमाता आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना इस्त्रो भेटीची संधी मिळाण्यासाठी संकल्प

**शहादा, दि.२४ (प्रतिनिधी)- वेलीमाता आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना इस्त्रो,आय.आय.एम, आय.आय.टी, संस्था च्या भेटीसाठी सहलीची संधी मिळावी यासाठी संकल्प करण्यात आला.**



जळगाव येथील नोबेल फाउंडेशन यांच्या विद्यमाने इयत्ता ५ वी ते ७ वी, इयत्ता ८ वी ते १० वी आणि अकरावी, बारावी अशा तीन गटात महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन परीक्षा घेण्यात येते. प्रामुख्याने गणित विज्ञान व तंत्रज्ञान या विषयावर आधारित ही परीक्षा असते. विद्यार्थ्यांची तीन वेळा चाचणी घेण्यात येते. इ.५ वी ते ७ वी व ८ वी ते १० वी या विद्यार्थ्यांना गणित, विज्ञान व तंत्रज्ञान या विषयावर आधारित तर तिसऱ्या गटात फिजिक्स, केमिस्ट्री ,बायलॉजी विज्ञानातील जी.के व तंत्रज्ञान या विषयांवर परीक्षा घेण्यात येते. विद्यार्थ्यांच्या तिसऱ्या चाचणी नंतर परीक्षा घेतल्यावर सर्व गटात मिळून १०० विद्यार्थ्यांची निवड केली जाते. निवडलेल्या या १०० विद्यार्थ्यांना मोफत अहमदाबाद येथील इस्त्रो, आय.आय.टी व आय.आय.एम या संस्थांना भेट देण्यासाठी अभ्यास सहलीचे मोफत आयोजन नोबेल फाउंडेशन करते. नोबेल फाउंडेशनचे जयदीप पाटील सर यांनी वेली माता आश्रम शाळेच्या सर्व गणित व सायन्सच्या शिक्षकांशी संवाद करत मार्गदर्शन केले. इयत्ता ५ वी पासून १२ वी पर्यंत विद्यार्थ्यांचे गणित व विज्ञान हे विषय पक्के व्हावेत, विद्यार्थ्यांनी या विषयात चांगली प्रगती करावी या साठीच जळगाव येथील नोबेल फाउंडेशन महाराष्ट्रातील विज्ञान चळवळ म्हणून हा उपक्रम गेल्या ६ वर्षापासून राबवित असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षकांनी आपली वेलीमाता आश्रम शाळा या उपक्रमात विद्यार्थी प्रत्यक्ष सहभागी होतील यासाठी प्रयतक करण्याचा संकल्प केला.

# स्व.दिलीपतात्या जगताप यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**धुळे, दि.२४- माजी नगराध्यक्ष, लोकमित्र स्व.तात्यासाहेब दिलीप उमराव जगताप यांच्या ७५ व्या जयंती निमित्त दि.२५ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता, हॉटेल चंद्रदिप रिजेंसी चितोडरोड चौफुली जवळ येथे दिलीपतात्या जगताप यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. यावेळी उपस्थित मान्यवरस्व.तात्यासाहेबांबाबत श्रद्धांजलीपर मनोगतं व्यक्त करतील. यानंतर, गोमातेला चारा वाटप करण्यात येणार आहे.**



सायंकाळच्या सत्रात स्व.तात्यासाहेब दिलीप उमराव जगताप प्रवेशद्वार कमानीचे उदघाटन व लोकार्पण सोहळा सायंकाळी चार वाजता होणार आहे. वाडीभोकररोड, ध्रुव होंडा शो रूम जवळ, देवपुर, धुळे येथे हे प्रवेशद्वार आहे. प्रवेशद्वार, स्वागत कमानीचे उदघाटन राजशिष्टाचार व पणन मंत्री तथा धुळ्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, आमदार अनुप अग्रवाल, माजी महापौर प्रतिभा चौधरी, आमदार राघवेंद्र भदाणे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मनपा आयुक्त श्रीमती अमिता दगडे पाटील, माजी उपमहापौर वैशाली वराडे, माजी नगरसेवक भिकन वराडे, माजी नगरसेवक नरेश चौधरी, भाजपा जिल्हा अध्यक्ष गजेंद्र अंपळकर, देवपुर पश्चिम पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक धनंजय पाटील, मनपा अभियंता पी.डी. चव्हाण, पवार वकील, विशाल भट, श्री.शिंदे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. प्रवेशद्वार कमानीचे उदघाटनानंतर 'चंद्रदिप' हाऊस बंगल्यावर प्रमुख अतिथींच्या हस्ते स्व.तात्यासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन आणि अभिवादन कार्यक्रम होणार असून अभिवादन कार्यक्रमादरम्यान काही उपस्थित मान्यवरांचे, श्रद्धांजलीपर मनोगतं होतील असे लोकमित्र स्व.तात्यासाहेब दिलीप उमराव जगताप प्रतिष्ठान धुळे यांनी कळविले आहे.

# धुळ्यात मंगळवारी विभागस्तरीय क्रीडा स्पर्धा,तंत्र प्रदर्शनाचे आयोजन

**धुळे, दि.२४- इतिहासाचार्य राजवाडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, देवपूर, धुळे येथे मंगळवार २८ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता नाशिक विभागस्तरीय क्रीडा स्पर्धा व तंत्र प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. अशी माहिती इतिहासाचार्य राजवाडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मनोजकुमार चकोर यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.**

क्रीडा स्पर्धा व तंत्र प्रदर्शनासाठी नाशिक विभागातील धुळे, जळगाव, नंदुरबार, नाशिक, अहिल्यानगर अशा ५ जिल्हयातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून जिल्हास्तरीय स्पर्धेतून निवड झालेले मुले, मुली धुळे येथील विभागस्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होणार आहे. या क्रीडा स्पर्धा जिल्हा क्रिडा संकूल गोंदूर रोड, स्टेडीयम, वाडीभोकर रोड, धुळे येथे तसेच गरूड मैदान, साक्री रोड, धुळे येथे २८ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे. तसेच विभागस्तरीय तंत्र प्रदर्शनाचे इतिहासाचार्य राजवाडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, देवपूर, धुळे येथे आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्धटन धुळे शहराचे आमदार अनुपभैय्या अग्रवाल यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी धुळे ग्रामीणचे आमदार राघवेंद्र पाटील असणार आहे. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे उपस्थित राहणार आहे. त्याचप्रमाणे वि.का.राजवाडे संशोधन मंडळाचे अध्यक्ष प्रकाश पाठक, आयएमसी अध्यक्ष प्रशांत काकडे, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश टिळे, आयएमसी सदस्य नितीन अग्रवाल, नितीन देवरे, मनोजकुमार दास, जितेंद्र सोनवणे, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री एण्ड ग्रीकल्चर उपाध्यक्ष नितीन बंग, उद्योजक राजेंद्र जाखडी हे उपस्थित राहणार आहे.

या विभागस्तरीय क्रीडा स्पर्धा व तंत्र प्रदर्शनास धुळे जिल्ह्यातील सर्व क्रीडा प्रेमी व सर्व शालेय, महाविद्यालयीन मुले / मुली, नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन नाशिक विभागाचे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण सहसंचालक अनिल गावित, नाशिक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालयाचे उपसंचालक राजेश मानकर, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी तथा इतिहासाचार्य राजवाडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्या मनोजकुमार चकोर यांनी केले आहे.



# पटेल विद्यालयात कॉपीमुक्त अभियान सप्ताह

**तऱ्हाडी, दि.२४ (प्रतिनिधी) - आर सी पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय टेकवाडे शाळेत कॉपीमुक्त अभियान सप्ताह निमित्त पालक सभेचे आयोजन करण्यात आले.**

अध्यक्षस्थानी लवसिंग राजपूत यांनी भूषविले. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजनाने करण्यात आली. पालक सभेचे प्रास्ताविक प्राध्यापक एस.एम. पाटील यांनी केले. प्राध्यापक डॉ.जे.व्ही. पाटील यांनी परीक्षा प्रक्रिया व नव्याने होऊ घातलेले बदल याबाबत पालकांना सविस्तर माहिती दिली. विद्यालयाचे प्राचार्य एन.सी.पवार यांनी परीक्षा काळात पालकांनी विद्यार्थ्यांची काळजी कशी घ्यावी. तसेच परीक्षा पद्धती, बाबतची माहिती पालकांना करून दिली. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जावे. तसेच तणावरहीत वातावरणात परीक्षा द्यावी. परीक्षेत कुठल्याही गैरप्रकाराला बळी पडू नये असे आवाहन करण्यात आले.पालक सभेत इयत्ता बारावी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन व्ही.सी.महाजन यांनी तर आभार प्रदर्शन आर. एस.वळवी यांनी केले. पालक सभा यशस्वीतेसाठी विद्यालयाचे पर्यवेक्षक आर. एल.तवर, डी.बी.तडवी, के. आर. पावरा, एस.बी.वळवी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.


# म.से.संघाच्या कार्यालयात काव्यसंग्रहाचे प्रकाशन


धुळे, दि.२४- पांझरा नदी किनारी मराठा सेवा संघाच्या कार्यालयात दि.२६ जानेवारी रोजी दुपारी तीन वाजता माजी प्राचार्य अभिमन्यु गिरधर पाटील लिखीत हे थेंब अमृताचे काव्यगीत संग्रहाचा प्रकाशन सोहळा ॲड.जे.टी.देसले यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

काव्यगीत संग्रह मराठी, हिंदी, इंग्रजी भाषांमधून प्रकाशित होणार आहे. प्रकाशन डॉ.एस.टी.पाटील व व्ही.के.भदाणे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी संदीप पाटील, चंद्रशेखर पाटील, डॉ.सदाशिव सुर्यवंशी, डॉ.पापालाल पवार, रवींद्र पाटील, अशोक पाटील यांच्यासह माजी आ.शरद पाटील, एम.एल.सुर्यवंशी, ॲड.एम.एस.पाटील, संतोष सुर्यवंशी, एन.पी.वाणी, भगवान पाटील, बी.टी.देसले, सुलभा कुवर, टी.पी.शिंदे, सचिन पाटील आदि मान्यवर उपस्थित राहणार आहेत.












## शब्दकोडे क्रमांक.२०७९



**आडवे शब्द :** १.वेड्यांचे इस्पितळ ५.राखी, अमिताभ बच्चन आणि सशी क□र यांचा एक सिनेमा ८.उद्याच्या नंतर येणारा दिवस ९.कंक□ ११.सुंदर १२.औषध १४.गुं□ १६ मनास घातलेला बांध १८. □ती २०.फायदा २२ □ळ्यांत लावावयाचे एक अंजन २५.शिरा बनवण्यासाठी वा□रतात २७.□कलेला २९.सणसणीत हाणलेली चा□टी ३१.वर्ष ३२.छातिठोक□णे सांगितलेला अधिकार ३४.□ष्कळ ३५.देश ३७.सुट ३९.कागदाच्या □वीक□ील रकाना ४१ एक हजार किलो ४२ जोम,माज ४३.कशासाठी ४४.बगल ४७.ताकद ४८.गोळा ५०.□त्र ५२.अतुट, अविरत ५५.चटकन रागावणारा ५६.च□ती भाजण्याचे साधन ५७.तमाशात सादर होणारे नाटक ५८.□चण्यास हलके असलेले ५९.सेवक **उभे शब्द :** १.जेवताना खाण्याचा एक कुरकुरीत पदार्थ २.फळाच्या आतील मगज ३.पंच ४ छंद ५.कडू चवीचा ६.मेहनत ७.माकडांची एक जात १०.हिंदीत-रोप लावलेली कुंडी ११.सैन्याने विश्रांतीसाठी ठोकलेला तळ वा तंबू १३.वचन १५.मग्न १७. चतुर्थ १९.किंमत २१.दुरावा २२.भारत भूमीतील एक अंध संत २३.मोजदाद करण्याचे साधन २४.खोटी बातमी २६.पाण्याचा एक प्रकारचा नैसर्गिक जलाश□ २८.कधी तरी २९.नशा आणणारी एक मादक वस्तू वा चीज, धर्मेंद्र , हेमा मालिनी □ांचा एक सिनेमा ३०.एक चवदार मासा ३३.सहवास ३६.खोड्या काढणारा ३८.घाई,धांदल,गोंधळ ४०.माणूसकी ४५.पा□जमा ४६.एक उभ□चर जीव ४९.वस्त्र ५१.पाप,अधम ५३.बंध ५४.आरसा बनवण्यासाठी वापरतात

### शब्दकोडे क्रमांक.२०७८ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | चा | र | वं | त | | क | सा | ई | | का | न |
| रा | | सा | द | | कि | ट | क | | ह | | ज |
| ट | न | | न | ज | र | | व | त | न | दा | र |
| | ग | ठठा | | र | | फ | | र | न | वे | |
| मा | द | | सा | | स | र | प | ण | | दा | दा |
| न | | सा | वं | न | | क | | त | ग | र | |
| व | की | ल | | व | क्त | | स | ला | म | | को |
| ता | | स | ह | ल | | पा | | व | | दा | म |
| | नी | | र | | स | प | क | | म | ह | ल |
| पो | | स | क | ल | | णी | | प | ल | क | |
| ल | व | | त | ल | म | | श | र | म | | र |
| का | स | व | | ना | न | क | | का | ल | व | ण |

## निवडणुका निर्भय, भयमुक्त, नि:पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी सर्वांचे योगदान मोलाचे : जिल्हाधिकारी

**धुळे, दि.२४- गेल्या वर्षभरात झालेल्या लोकसभा, विधान परिषद व विधानसभा निवडणूका सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या उत्तम समन्वयामुळे निर्भय, भयमुक्त, नि:पक्ष वातावरणात पार पाडल्या. याकरीता सर्वांचे योगदान मोलाचे असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, महापालिका, नगरपालिकेच्या निवडणूकीतही सर्वांनी समन्वयाने काम करावे. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी केले.**




राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधुन आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सातपुडा सभागृहात राष्ट्रीय मतदार दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी जिल्हाधिकारी श्री.पापळकर बोलत होते. या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, महापालिका आयुक्ता अमिता दगडे पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, उपजिल्हाधिकारी संदीप पाटील, संजय बागडे, चंद्रशेखर देशमुख, महादेव खेडकर, उप जिल्हा निवडणूक अधिकारी गंगाराम तळपाडे, उपविभागीय अधिकारी रोहन कुवर, मनपा उपायुक्त श्री.बाविस्कर, राज्य उत्पादन शुल्काच्या अधिक्षक स्वाती काकडे, जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी महेश खडसे, अपर तहसिलदार वैशाली हिंगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी स्वरांजली पिंगळे, तहसिलदार प्रविण चव्हाणके आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी पापळकर म्हणाले की, मागील वर्षभरात झालेल्या लोकसभा, विधान परिषद व विधानसभा निवडणूकीत सर्व कार्यालय प्रमुखासोबतच त्यांच्यासोबत काम करणारे कर्मचारी यांनीही अतिशय चांगल्या प्रकारे काम केले. त्यांच्या उत्तम सहकार्यामुळेच निवडणूका निर्भय, भयमुक्त, नि:पक्ष वातावरणात पार पाडल्या यात सर्वांचे योगदान मोलाचे आहे. त्यामुळे सर्वांचे अभिनंदन केले. आगामी काळात होणा-या स्थानिक स्वराज्य संस्था, महापालिका, नगरपालिकेच्या निवडणूकीत ही सर्वांनी समन्वयाने काम करुन निवडणूका यशस्वीपणे पार पाडाव्यात. तसेच सर्व नागरिक, नव मतदारांनी आपली नावे मतदार यादीत नोंदवावी त्याचप्रमाणे मतदार यादीतील आपले नाव, पत्ता, जन्मतारीख, मतदार क्रमाक हे तपासून खात्री करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

**यांचा झाला सत्कार**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, महापालिका आयुक्त अमिता दगडे पाटील, अपर पोलीस अधिक्षक किशोर काळे, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, उपजिल्हाधिकारी चंद्रशेखर देशमुख, उपविभागीय अधिकारी रोहन कुवर, राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक स्वाती काकडे, जिल्हा माहिती अधिकारी विलास बोडके, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी महेश खडसे, जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी स्वराजंली पिंगळे, तहसिदार प्रविण चव्हाणके, नायब तहसिलदार प्रविण बागुल, सहायक महसुल अधिकारी कैलास जंघाळे, महसुल सहायक सागर पाटील, संगणक परिचालक चेतन बाविस्कर, हर्षल सोनवणे, शिपाई बाबु कोठुळे, गणेश माळी या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

## निधन वार्ता

### राहुलसिंग गिरासे

धुळे, दि.२४- गुलाबसिंग चिधा राजपूत जसाणे (सेवानिवृत्त डीडीसी बँक) यांचे चिरंजीव व दिपकसिंग गिरासे (मुख्याध्यापक शहादा) यांचे लहान भाऊ राहुलसिंग गिरासे (पोलीस) यांचे अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा शनिवार दि.२५ रोजी सकाळी दहा वाजता चंद्रोदय कॉलनी, वलंवाडी शिवार, बोरसे नगर, धुळे येथील राहत्या घरापासून निघणार आहे.



### मुकेश शाह

नंदुरबार, दि.२४-शहरातील मेघना एजन्सीचे संचालक मुकेश जमनादास शाह (वय ७१) यांचे दि.२२ जानेवारी रोजी वाशी नवी मुंबई येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सून, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. उद्योजक चिंतनभाई शाह यांचे ते वडील होत.



## शिंदखेड्यात युवकाला फायटरने मारहाण

**धुळे, दि.२४ (प्रतिनिधी)- शिंदखेड्यात दिवाळीत फटाके फोडण्यातील जुना वाद उकरून काढून एका युवकाला सहा जणांनी फायटर व हाताबुक्क्यांनी मारहाण करुन जखमी केल्याने शिंदखेडा पोलीस ठाण्यात गून्हा दाखल झाला आहे.**

दि.२४ रोजी सकाळी साडेअकरा वाजता रोहीत वाल्मिक पाटोळे वय २४ रा.आंबेडकर नगर, शिंदखेडा हा युवक शिंदखेड्यातील एसएसव्हीपीएस कॉलेज समोर उभा असताना विरेंद्र माळी, रा.शिंदखेडा हा रोहीत पाटोळे जवळ येऊन रागात बघून निघून गेला. त्यानंतर काही वेळात प्रशांत पाटील व त्याचे सोबत सहा मुले त्याठिकाणी आले व रोहीतला दम देऊन तुला जास्त माज आला आहे का, दिवाळीत देखील फटाके फोडण्यावरून आमच्याशी तू (रोहीत) वाद घातला म्हणून प्रशांत पाटील याने त्यांचे हातातील लोखंडी फायटरने तोंडावर डाव्या बाजूला मारहाण केली व त्याचे सोबत असलेल्या सहा मुलांनी रोहीतला हाताबुक्क्यांनी मारहाण करुन जखमी केल्याची फिर्याद रोहीतने दाखल केली असून पोलीसांनी सहा जणांविरुद्ध गून्हा दाखल केला. फिर्यादीस औषधोपचारासाठी त्याचा चुलत भाऊ राहूल याने दवाखान्यात दाखल केले. अद्याप कुणालाही अटक झालेली नाही. पुढील तपास पोलीस करीत आहेत.



## चोपडातील सहकारी सूतगिरणी संचालक अपघातात ठार

(पान ३ वरुन) उभ्या युवकांनी रुग्णवाहिकेद्वारे त्यांना शिरपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तातडीने उपचाराला सुरवातही केली. पण काही वेळाने विनायक सोनवणे यांची प्राणज्योत मालवली. सीमा सोनवणे यांच्यावर प्रथमोपचार करुन धुळे येथे रवाना करण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच सोनवणे यांचे भाऊ, मुलगी व मुलगा रुग्णालयात पोहचले. मृत सोनवणे यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, भाऊ असा परिवार आहे. ट्रकचालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

## अनधिकृत होर्डिंगविरोधात महापालिका, पोलिस विभाग करणार संयुक्त कारवाई; आजपासून महिनाभर मोहीम

**धुळे, दि.२४- शहरात अधिकृत बॅनर, होर्डिंगवर कार्यवाही करण्यासाठी महानगरपालिका मार्फत दि.२६ जानेवारी ते दि.२६ फेब्रुवारी पर्यंत मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत मनपा व पोलीस प्रशासन यांचे संयुक्त पथक तयार करून वार्ड निहाय कारवाई केली जाणार आहे.**

सदर कारवाईबाबत मनपा आयुक्त तथा प्रशासक अमिता दगडे पाटील व पोलीस उपअधिक्षक (गृह) विश्वजीत जाधव तसेच सहा. आयुक्त स्वालीया मालगावे, सहा.आयुक्त प्रांजली मुंडे, जाहिरात विभाग प्रमुख राजेंद्र माईनकर आणि संबंधित वार्ड अधिकारी बैठकीत उपस्थित होते. सदर बैठकीत अनधिकृत बॅनर होर्डिंग लावणाऱ्या वर गुन्हा दाखल करणे बाबत निर्देश देण्यात आले आहे. धुळे महानगरपालिका क्षेत्रामध्ये सार्वजनिक ठिकाणी जाहिरात फलक/बॅनर लावणाऱ्या व्यक्ती, संस्था, राजकीय पक्ष यांनी महानगर पालिकेची परवानगी प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. बहुतेक प्रसंगी परवानगी न घेता अनधिकृत जाहिरात फलक लावण्यात येतात ज्यामुळे शहराचे विद्रुपीकरण होते तसेच वर्दळीच्या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता असते. जाहिरातधारकांनी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर अर्ज करून जाहिरात परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच परवानगी घेतल्यावर जाहिरात फलक/ बॅनर वर कोड चिकटवणे बंधनकारक आहे अन्यथा गुन्हा नोंदविण्यात येणार आहे. प्रतिबंधित क्षेत्रात जाहिरात फलक/बॅनर लावल्यास व निश्चित केलेल्या जागा व्यतिरिक्त इतर ठिकाणी जाहिरात फलक/बॅनर लावल्यास महाराष्ट्र राज्य मालमत्ता विरुपणास प्रतिबंध कायदा १९९५ नुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

## राज्यभर आंदोलन

(पान २ वरुन) लाख मतदान कसे वाढले? याचे पुरावे निवडणूक आयोग देत नाही. राज्यात आलेले सरकार आपल्या मताचे नाही अशी जनभावना निर्माण झाली असून मतदान मतपत्रिकेवरच घ्यावे अशी मागणी जनतेतूनच येत आहे.

पान १ वरुन

## संयुक्त समिती बैठकीत प्रचंड गोंधळ

की, सरकारला वक्फच्या मालमत्तांवर नियंत्रण हवे आहे.

लोकसभेत सादर झालेल्या वक्फ विधेयकामध्ये ४४ दुरुस्त्या सुचवण्यात आल्या आहेत. या प्रत्येक दुरुस्तीवर जेपीसीच्या दोन दिवसांच्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करणे अपेक्षित होते. राज्या-राज्यांतील वक्फ मंडळांकडे १९५० मध्ये ३५ हजार जमिनी होत्या, गेल्या ७५ वर्षांमध्ये त्यांची संख्या वाढून तब्बल १० लाख झाली आहे. त्यातील अनेक जमिनी वक्फ मंडळाने बळकावल्याचा दावा जेपीसीतील सत्ताधारी भाजपच्या सदस्यांनी केला आहे. या जमिनींच्या मालकीहक्काबाबत पूर्वलक्ष्यी प्रभावाने फेरआढावा घेतला पाहिजे, अशी मागणी जेपीसीमध्ये करण्यात आली.

जेपीसीच्या आतापर्यंत झालेल्या ३४ बैठकांपैकी बहुतांश वादळी ठरल्या होत्या. तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांची बाटली फोडण्यापर्यंत मजल गेली होती. काँग्रेस, द्रमुक, शिवसेना-ठाकरे गट आदी विरोधी सदस्यांनी विधेयकातील दुरुस्त्यांना कडाडून विरोध केला होता. त्याची पुनरावृत्ती आजच्या बैठकीतही पाहायला मिळाली.

## एसटीच्या तिकिट दरात मोठी वाढ

घेण्यात आला आहे, यासंदर्भातील माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. याबरोबरच रिक्षा आणि टॅक्सीचा प्रवासही महागणार आहे. एक फेब्रुवारीपासून रिक्षा आणि टॅक्सीची देखील भाडेवाढ होणार असल्याची माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. आज मी राज्याच्या प्रधान सचिवांबरोबर चर्चा केली. तेव्हा त्यांनी सांगितले की गुरुवारी एक महत्वाची बैठक झाली. त्या बैठकीत एसटीच्या भाडेवाढीबाबत निर्णय घेण्यात आला आहे. कारण गेल्या अनेक वर्षांपासून एसटीची भाडेवाढ करण्यात आली नव्हती. आता एसटीची १४.९७ टक्के भाडेवाढ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच एसटीची ही भाडेवाढ आजपासून लागू करण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

## सव्वादोन लाखांचा ऐवज लंपास

३० हजार रुपये किंमतीचे सात तोळे वजनाचे चांदीचे बास्के दोन नग, २५ हजार रुपये किंमतीचे ५ तोळे वजनाचे चांदीचा हार, १० हजार रुपये किंमतीचे २० तोळे वजनाचे चांदीचे पायातील सारणे, ५ हजाराचे १० तोळे वजनाचे चांदीचे पायातील साखळ्या असा एकुण २ लाख २० हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेला आहे. याबाबत रुमा जेरमा वळवी यांनी तळोदा पोलिस ठान्ह्यात फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास हेकॉ. विजय जावरे करीत आहेत.

## उठावना एवं शोक-बैठक



बड़े दुख के साथ आपको सूचित किया जाता है कि स्व.रामगोपाल, स्व.वसंतलाल, स्व.कमलकिशोर इनके बहनोई तथा मनोहर, रमाकांत, नीलकांत, शाशिकांत, शेखर, संदीप इनके फुफाजी

**श्री.राजेंद्रकुमार बद्रीलालजी गोयल**


मेमदीवाले, इंदोरइनका दुखद निधन २३-१-२०२५ को हो गया है।

उनका **उठावना** आज शनिवार दि २५-१-२०२५ को शाम को ४:०० बजे एवं उनकी **शोक बैठक** शाम को ४:०५ से ५ बजेतक वही पर अग्रवाल विश्राम भवन, नदी किनारे, धुलिया यहा पर है ।

-: शोकाकुल :-

नंदकिशोर बाबूलाल अग्रवाल नारायण श्रीकिसन अग्रवाल
किशोर काळूराम अग्रवाल सुरेश मदनलाल अग्रवाल
मनोहर, रमाकांत, नीलकांत, शशिकांत, शेखर, संदीप, यतीराज, निकुंज, कृष्णा, रजत, चिन्मय, तन्मय
**एवं समस्त भुतिया परिवार**

**फर्म : पुसमल पापालाल अग्रवाल**



**कै.श्री.बापुसो.अमृतराव पुंडलिक पाटील**
(मा.सरपंच, थाळनेर)
जन्म ता. : १६/११/१९३२ मृत्यु ता. १७/०१/२०२५

**दशक्रियाविधी गंधमुक्ती व उत्तरकार्य**
रविवार दि.२६/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वा. करण्याचे योजिले आहे.
* स्थळ : दामसरपाडा, थाळनेर ता.शिरपूर जि.धुळे

**वैचारीक वारसदार व शोकाकुल**
चि.चिनार माधुरी निशिकांत पाटील (पंतू)
श्री.डॉ.निशिकांत निर्मला सुभाष पाटील (नातू)

* फर्म *
**अमृतेश्वर वाडा**
चिनार इंटेरिओ ॲण्ड वूड वर्क, दत्तमंदीर, धुळे
चिरायू मुलांचे हॉस्पीटल, दत्तमंदीर, धुळे

॥ ॐ नम: शिवाय ॥

**बेळगाव निवासी परमपूज्य गुरुदेवता श्री कलावती देवी यांचा**

## पुण्यस्मरण उत्सव

शुक्रवार दि.२४ जानेवारी ते गुरुवार दि.३० जानेवारी या कालावधीत संपन्न होणार आहे. उत्सव कालावधीत दररोज पुढील प्रमाणे कार्यक्रम होतील. स.६ ते संध्या.६ पर्यंत भगिनींचे व संध्या ६ ते रात्री १० पर्यंत बंधूंचे अखंड नामस्मरण
स.७ ते ८.३० पुण्यतिथी प्रात:स्मरण भजन व चरित्र वाचन
दु.१०.३० ते १२ पुण्यतिथी दुपारचा कार्यक्रम व चरित्र वाचन
सायं.४ ते ५.३० पुण्यतिथी सायंस्मरण भजन व चरित्र वाचन
रात्रौ ८.३० ते १० श्रीकृष्णप्रताप वाचन, गवळणी व प्रदक्षिणा
शुक्रवार दि.३१ जानेवारी रोजी स.७ ते ८.३० या वेळेत गरुमाय गुणगान होऊन उत्सवाची सांगता होईल.
**स्थळ : परमार्थ निकेतन श्रीहरिमंदिर, एसएसव्हीपीएस कॉलेज मागे, देशमुख अपार्टमेंटजवळ, प्रभातनगर, देवपूर, धुळे**

**पाहिजेत**
खालील जागांसाठी समक्ष भेटा!
१) इलेक्ट्रीशियन - २
२) हेल्पर - ४
**बांगड कुलर्स ॲन्ड फर्निचर**
उदय बंगला, बँक ऑफ बडोदा शेजारी, मालेगावरोड, धुळे
9422288421
02562 - 232444

**पाहिजेत**
**सोलर सिस्टम** विक्रीसाठी **सेल्समन व सेल्सगर्ल** त्वरित लावणे आहे.
- संपर्क -
मो. 7249728713
7972126440

सागवान लाकडाचे तयार दरवाजे चौकट फ्रेम, पॉलिश केलेले सागवान शटर्स, फ्लश डोअर, कोटींग दरवाजे, फायबर दरवाजे, RCC सिमेन्टचे कलर चौकट व खिडकी तसेच प्लास्टो कंपनीची पाण्याची टाकी इ. उत्तम क्वॉलिटी व वाजवी रेटमध्ये मिळण्याचे एकमेव ठिकाण..



**शंकर विजय सॉ मिल**
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे.
मो. 9595397718, 9665886722

**रो हाऊस घर विकणे**
पार्वती नगर, भाईजी नगर येथील रो हाऊस विकणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**पांढरे डागांसाठी प्रभावी उपचार**
४० वर्ष अनुभव असलेले राष्ट्रस्तरीय ज्वेल ऑफ इंडिया पुरस्कार प्राप्त
**डॉ. वाल्मीक बी. पाटील**
यांनी अनेक रुग्णांचे पांढरे डाग बरे केलेले आहेत
* व्हिझीट : मुंबई, पुणे, नाशिक, धुळे. * सुचना : येण्याआधी फोन करावा व हे कात्रण सोबत आणावे.
पत्ता : स्टेडियम चे शॉप नं. २७, साई मानवता हॉस्पिटल समोर, बिजासनी टायर सर्व्हिस शेजारी, गोंदूर रोड, स्टेडियम, धुळे.
मो. 9822515485, 9545770988

**पाहिजे**
हॉटेलसाठी मॅनेजर पाहिजे (संगणकचे ज्ञान आवश्यक)
**हॉटेल गौरव**
मालेगावरोड, अग्रसेन चौक, धुळे
8698442361
8262022328

**लहान प्लॉट विकणे**
अरिहंत नगर, मोहाडी रोड येथील १५०० चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**प्लॉट विकणे**
जयहिंद सीनियर कॉलेज पासून जवळ, पंचायत समिती जवळ ५४०० फुटाचा प्लॉट अपार्टमेंट, फ्लॅट सिस्टीम साठी उपयुक्त विकणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**हेल्पर पाहिजेत**
फर्निचर दुकानाकरिता हेल्पर पाहिजेत. अनुभव असल्यास प्राधान्य. समक्ष भेट सायं.६ ते ८
**फर्निचर फर्स्ट**
जेबी रोड, टॉवर बगीचा जवळ, धुळे
9420057475
8766836880





बँकेच्या क्रेडीट कार्डवर **EMI** सुविधा उपलब्ध !
BAJAJ FINSERV HDB FINANCIAL SERVICES
**0%** फायनान्सची सुलभ **E.M.I** सुविधा उपलब्ध.
फायनान्सला लागणारी कागदपत्रे: 1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
नियम व अटी लागू*
57 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते **श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.**
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763
ak media- 238222

**पाहिजेत**
**वेटर पाहिजे**
-: संपर्क :-
**हॉटेल प्रिया**
8087564754

**पाहिजेत**
**ओम हॉस्पीटल**
येथे अनुभवी नर्सिंग स्टाफ पाहिजे. अनुभव असल्यास प्राधान्य.
भेटण्याची वेळ सकाळी १० ते १
अग्रवाल नगर, मालेगावरोड, धुळे
02562 - 241313
283318

**पाहिजेत**
होलसेल मेडीकल दुकानामध्ये कामासाठी मुले पाहिजेत. अनुभव असल्यास प्राधान्य.
-: संपर्क :-
**तेजस डिस्ट्रीब्युटर्स**
गल्ली नं.५, धुळे
8888096777

**विकत घेणे आहे**
**घसरगुंडी विकत घेणे आहे**
-: संपर्क :-
9545090049

**प्लॉट विकणे आहे**
सर्व्हे नं. ९१, प्लॉट नं. २४ माहेश्वरी सोसायटी ८५० स्के. फुट नकाणे रोड साईबाबा मंगल कार्यालय जवळ, धुळे.
-:संपर्क :-
**रमेश गंगाराम साळवे**
मो. ७०६६५५९४५५, ९४२२२८८९४८

**पाहिजे**
अकौन्टींगच्या कामासाठी हुशार व अनुभवी मुलगा किंवा मुलगी पाहिजे. टॅलीचे ज्ञान आवश्यक
**साईबाबा रेडीमेड ॲण्ड होजिअरी**
गल्ली नं.२, मुल्लाबाडा रोड, अकबर चौक, धुळे
9422286958
7350148955

**पाहिजेत**
- **एच.आर.एक्झीकेटिव्ह** : पदवीधर, २ ते ३ वर्ष अनुभव
- **स्टोअर एक्झीकेटिव्ह** : पदवीधर, ४-५ वर्ष अनुभव कॉम्प्युटर, स्किल । टायपिंग
- **ड्रायव्हर** : दहावी पास, चारचाकी लायसन्स धारक

संपर्क : महेंद्र मराठे (HR)
GJ Foods, जुनवणे
मो. 79721 75849

**पाहिजे**
ऑफिससाठी फोनवर उत्कृष्ठ संभाषण करणारा व फोर व्हीलर गाडी चालवणारा अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. समक्ष भेटा!
-: संपर्क :-
9823178279

**शेती विकणे आहे**
कन्हेरे शिवार ता.पारोळा जि.जळगाव येथील शेत जमीन विकणे आहे.
-: संपर्क :-
7620823955

**घर विकणे आहे**
पुर्वमुखी घर, विठ्ठल मंदिर समोर, ब्रह्मटेक, खालचे गाव, शिरपूर विकणे आहे.
-: संपर्क :-
7620823955

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०